**कृपया प्रसिध्दिसाठी** **18 डिसेंबर 2008**

## प्रस्तावित चारकोप मेट्रो कारशेडच्या विरोधात शुक्रवारी सर्व पक्षीय ठिय्या आंदोलन

**मुंबई, गुरुवार :** कांदिवली पश्चिम मधील चारकोप येथील प्रस्तावित मेट्रो कारशेड प्रकल्पासाठी सर्व्हे करायला गेलेल्या अधिका-यांना काल हजारो रहिवाश्यांनी उत्स्फुर्तपणे पिटाळून लावल्यानंतर आता उद्या शुक्रवारी सरकारचे या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी ठिय्या आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात स्थानिक रहिवाश्यांसह श्री. राम नाईक, श्री. भाई गिरकर, श्री विनोद घोसाळकर, श्री. जयप्रकाश ठाकुर, श्री. योगेश सागर आदी भाजपा-शिवसेनेचे अनेक वरिष्ठ नेते, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश महासचिव श्री. संदेश कोंडविलकर, रिपब्लिकन पार्टीचे जिल्हा अध्यक्ष श्री. हरिहर यादव, समाजवादी पार्टीचे जिल्हा अध्यक्ष श्री. गिरजाशंकर यादव, आदी सर्वपक्षीय नेते व स्थानिक व्यापारी संघटना सामील होणार आहेत, अशी माहिती झोपडपट्टी बचाव समिती, कांदिवली पश्चिम चे अध्यक्ष श्री. बाबा सिंह यांनी आज एका प्रसिध्दि पत्रकाद्वारे दिली आहे.

या संदर्भात अधिक माहिती देताना श्री. बाबा सिंह म्हणाले,"मेट्रो रेल्वेसाठी चारकोप येथे प्रस्तावित कारशेडच्या भूखंडामध्ये गणेश नगर, संजय नगर, लालजी पाडा, गांधी नगर, एकता नगर आणि जनता कॉलनी या झोपडपट्टया असून ही वस्ती 30 वर्षांपेक्षाही जुनी आहे. त्यामध्ये जवळ - जवळ 14 हजार कुटुंबे असून दोन हजार ते अडीच हजार छोटी दुकाने, लघुउद्योग, छोटे कारखाने, त्याचप्रमाणे 8 मान्यताप्राप्त शाळा, मंदीरे, मशिदी आणि चर्च आहेत. ही झोपडपट्टी वाचविण्यासाठी स्थापन झालेल्या सर्व पक्षीय झोपडपट्टी बचाव समितीला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त श्री. मिलिंद म्हैसकर यांनी गेल्या आठवड्यातच प्रस्तावित भूखंडाऐवजी सध्या मोकळ्या असलेल्या भूखंडांची पाहणी करण्यात येईल, तसेच समितीच्या मागण्या महाराष्ट्र सरकारकडे योग्य त्या शिफारशींसह निर्णय घेण्यासाठी पाठविण्यात येतील असे आश्वासन दिले होते. परंतु त्याप्रमाणे कोणतीही पाहाणी न करता प्रस्तावित भूखंडाचाच सर्व्हे करण्यासाठी बुधवारी अधिकारी आल्यानंतर स्थानिक जनतेत प्रचंड क्षोभ निर्माण होऊन हजारो नागरिक उत्स्फुर्तपणे रस्त्यावर आले."

या उत्स्फुर्त आंदोलनातच नागरिकांच्या न्याय मागण्यांसाठी शुक्रवार, 19 डिसेंबर रोजी सकाळी 9.00 वाजता लालजीपाडा सिग्नल, लिंक रस्ता, कांदिवली येथे ठिय्या आंदोलन करण्याचा निर्णय झाला आहे," अशी माहिती देऊन श्री. बाबा सिंह यांनी सर्वच नागरिकांनी ठिय्या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.

**(बाबा सिंह)**
**अध्यक्ष**
**मोबाईल क्र. 9323046896**